# नाशिक महानगरपालिका, नाशिक

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-९५ अन्वये,
सन २०२४ - २०२५ च्या 'अ', 'क' आणि 'प' अंदाजपत्रकाचे
(सन २०२३-२०२४ च्या सुधारित अंदाजपत्रकासह)

# महापालिका आयुक्तांचे निवेदन

## नाशिक महानगरपालिका, नाशिक

## सन 2023-2024 चे सुधारीत व सन 2024-2025 चे मूळ अंदाजपत्रक

## महापालिका आयुक्तांचे निवेदन

सर्व सन्माननीय नाशिककर बंधू भगिनींनो...

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-95 अन्वये महानगरपालिकेच्या जमा-खर्चाचे सन 2023-24 चे सुधारीत व सन 2024-25 चे मूळ अंदाज मा. स्थायी समितीस सादर करीत आहे. सदर अंदाज तयार करत असतांना, महापालिकेस प्राप्त होणारे विविध कर, शुल्क, फी, अनुदाने व अन्य जमा लक्षात घेऊन मनपा कार्यक्षेत्रात करावयाची विकास कामे व पुरवावयाच्या सेवांसाठी होणाऱ्या खर्चाचा प्राधान्यक्रम ठरवून योग्य ताळमेळ घालण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सन्माननीय मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे, सन्माननीय उप-मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस व सन्माननीय उप-मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार तसेच मा. पालकमंत्री श्री. दादाजी भुसे यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे नाशिक महानगरपालिका विकासाच्या पथावर असून, चालु आर्थिक वर्षात देखील शासनाच्या स्तरावरून मनपास विविध योजना अंतर्गत भरीव निधी प्राप्त होईल याची मला खात्री आहे.

शहरातील रस्ते, पदपथ, उड्डाणपूल, जलवाहिन्या, मलनि:स्सारण वाहिन्या, परिवहनसेवा, विद्युतीकरण, उद्यान विकास, शिक्षण, वैद्यकिय सेवा, घनकचरा व्यवस्थापन इ. नागरी सुविधांची पूर्तता करतांना समतोल विकासाचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच ई-गव्हर्नन्सचा प्रभावी वापर करुन, सुलभ, पारदर्शक व गतिमान प्रशासकीय कामकाज करण्यावर भर देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे वैद्यकीय सेवा, पर्यावरण, नमामी गोदा, स्मार्ट स्कूल ई. विकसीत करणे या बाबींवर प्रामुख्याने भर देण्यात आला आहे.

## सन 2023-24 चे सुधारीत अंदाजपत्रक

सन 2023-24 च्या मंजूर अर्थसंकल्पानूसार डिसेंबर २०२३ पर्यंतच्या नऊमाही कालावधीत प्रत्यक्ष जमा झालेला महसूल व करण्यात आलेल्या खर्चाचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच उर्वरित तीन महिन्यांच्या कालावधीत प्राप्त होणारी जमा आणि खर्च गृहित धरुन सन 2023-2024 चे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यानूसार र.रु. 298.33 कोटी आरंभीच्या शिल्लकेसह, र.रु. 2380.28 कोटी जमा व र.रु. 2319.25 कोटी खर्चाचे सुधारीत अंदाजपत्रक सादर करण्यात येत आहे. तसेच सन 2023-24 च्या सुधारीत अंदाजपत्रकानूसार अखेरची शिल्लक रु. 61.03 कोटी दर्शविण्यात आलेली आहे.

## सन 2024-2025 चे मूळ अंदाजपत्रक

सन २०२४-2025 या वर्षाचे अंदाज तयार करतांना जमा होणारा महसुल व यापुर्वी हाती घेतलेल्या कामांचे दायित्व याचा वास्तववादी विचार करून, जमा/खर्चाचे अंदाज तयार करण्यात आले आहेत.

**- उत्पन्नाच्या बाबी -**

महापालिकेच्या महसुलामध्ये प्रामुख्याने जीएसटी अनुदान, मालमत्ता कर, नगररचना शुल्क, पाणीपट्टी कर, मिळकत शुल्क, व इतर सेवा व शुल्क पासूनचे उत्पन्न यांचा समावेश आहे. सद्यस्थितीत पारंपारीक उत्पन्न स्त्रोतांसोबतच मनपास आता नवनवीन कायम स्वरुपी उत्पन्नाचे स्त्रोत तयार करावे लागणार आहे.

### ❖ जीएसटी/स्थानिक संस्था कर विभाग :

| | |
|---|---|
| सन 22-23 प्रत्यक्ष | रु.१२७४.४६ कोटी |
| सन २3-24 सूधारीत | रु.१३५०.०२ कोटी |
| सन २4-25 प्रस्तावित | रु.१४७२.४९ कोटी |

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार असाधारण क्रमांक 55 अन्वये वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे जकात व स्थानिक संस्था कर रद्द केल्याने स्थानिक प्राधिकारणांना भरपाई देण्यासाठी शासनाने अनुदान देणेचे धोरण निश्चित केले आहे.

- सद्यस्थितीत दर महा 107.01 कोटी अनुदान (वार्षिक 1284.12 कोटी) प्राप्त होत आहे. सन 202३-2४ करीता त्यामध्ये 8 टक्के वाढ गृहित धरून र.रु.१३५०.०२ कोटी अनुदान प्राप्त होऊ शकेल.
- सन 2024-25 मध्ये महानगरपालिकेस जीएसटी अनुदान, स्थानिक संस्था कर व 1 टक्का मुद्रांक शुल्क अधिभार थकबाकीसह असे एकुण अंदाजे र.रु. १४७२.४९ कोटी इतके उत्पन्न प्राप्त होईल.

### ❖ मालमत्ता कर व पाणीपट्टी विभाग :

| | |
|---|---|
| सन २२-23 प्रत्यक्ष | र. २५३.३२ कोटी |
| सन २३-24 सूधारीत | रु.२७८.५9 कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु. ३४८.१६ कोटी |
| • मनपा स्व:उत्पन्न व मा.शासनाकडे जमा करण्यात येणाऱ्या बाबींसहीत एकूण उत्पन्न | |

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे अचूक व पूर्ण कर निर्धारण करणे कामी मिळकतींचे सर्वेक्षण, GIS Mapping चे काम पुर्ण झाले आहेत.

- सन 2023-24 या वित्तीय वर्षात नवीन 28,120 मिळकतींवर कर निर्धारण करणेत आले असून, त्याद्वारे र. रु. 48.33 कोटी उत्पन्नात वाढ झालेली आहे.
- मालमत्ता व पाणीपटटी कराचे देयके, नोटीसीचा

इत्यादी करदात्यांना त्वरीत अत्याधुनिक पध्दतीने प्राप्त होणेकरीता ई-मेल द्वारे, Whatapps द्वारे तसेच SMS द्वारे सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच ई-पेमेंटद्वारे कराचा भरणा केल्यास एक टक्का सवलत देण्यात येत आहे.

## ❖ जाहिरात व परवाने विभाग :

| | |
|---|---|
| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. २२.५४ कोटी |
| सन २३-24 सूधारीत | रु. २१.२६ कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु. ४४.५८ कोटी |
| मनपा स्व:उत्पन्न व मा.शासनाकडे जमा करण्यात येणाऱ्या बाबींसहीत एकूण उत्पन्न | |

- मनपा मालकीचे एकूण 62 शॉपिंग सेंटर असून त्यामध्ये 2093 गाळे व ८५१ ओटे आहेत.
- नाशिक महानगरपालिकेच्या जागा व विद्युत पोल जाहिराती करीता उपलब्ध करुन ई-निविदेव्दारे वाटप करण्यात आलेल्या असून, त्यापासुन वार्षिक उत्पन्न १0 कोटी वाढीव उत्पन्न प्राप्त होणार आहे.
- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३१३,३७६ ते ३८६ अन्वये कारखाने, उद्योगधंदे व उद्योग आस्थापना, हॉटेल्स, खानावळी, उपहारगृहे, स्वीटमार्ट, केकशॉप, आईस्क्रिम पार्लर, केश कर्तनालय, ब्युटी पार्लर, खाद्यतेल, दुग्ध व दुग्ध्जन्य पदार्थ इत्यादी, कारखाने व उद्योगधंद्यासाठी साठा परवाना नोंदणीकरण इत्यादींना महापालिकेचा व्यवसाय परवाना लागु करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे वाणिज्य स्वरुपाच्या अस्थापनांवर इलेक्ट्रॉनिक/एल.ई.डी/ फ्लेक्सव्दारे मोठया प्रमाणात जाहिराती दिसुन येत आहेत. सदर वाणिज्य स्वरुपाच्या जाहिरातीवर नियंत्रण ठेवणे त्याचेकडुन परवाना शुल्क/दंड व जाहिरात कर वसुल करणेकामी निविदा राबविण्यात येणार असुन त्यापासुन नाशिक महानगरपालिकेस अतिरिक्त वाढीव उत्पन्न प्राप्त होणार आहे.

## ❖ नगररचना विभाग :

| | |
|---|---|
| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. २५२.७४ कोटी |
| सन २३-24 सूधारीत | रु. २३७.०३ कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु. २४४.७३ कोटी |
| मनपा स्व:उत्पन्न व मा.शासनाकडे जमा करण्यात येणाऱ्या बाबींसहीत एकूण उत्पन्न | |

नाशिक शहराचे ड्रोन सर्वेक्षण करुन GIS मध्ये मॅपिंग करणे संपूर्ण नाशिक शहराचे High Resolution Drone Image च्या सहाय्याने एरियल सर्वेक्षण करुन GIS मध्ये मॅपिंग करण्याचे काम प्रगती पथावर आहे. शहरातील अस्तित्वातील सर्व Utilities जसे पाणी/सांडपाणी/विद्युत/गॅस वाहिनी, उद्याने, आरक्षणे, नद्या/ नाला, बस/रेल्वेस्थानक, अनधिकृत बांधकामे व इत्यादींची माहिती गोळा करणे, संकलित विश्लेषण करणे व ते मॅप मध्ये दर्शविल्यामुळे भविष्यामध्ये नाशिक शहराचे नियोजनाच्या दृष्टीने सदर माहिती उपयुक्त ठरेल. शहरातील नाला सर्वेक्षणाचे देखील काम प्रगती पथावर आहे.

## ❖ मिळकत विभाग :

महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या व नागरिकांना सेवा पुरविण्याच्या अनुषंगाने नाशिक मनपाच्या मिळकती बि.ओ.टी. तत्वावर विकसित करण्याचा मानस आहे. सन २०२४-२०२५ मध्ये र.रु. १५० कोटी उत्पन्न प्राप्त करून घेण्याच्या अनुषंगाने विविध मिळकती बि.ओ.टी. तत्वावर विकसित करण्याची प्रक्रिया प्रगती पथावर आहे.

# खर्चाच्या बाबी

महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातून खर्चाच्या बाबींची प्राथमिकता ठरवितांना आधुनिक सोयी सुविधांयुक्त रस्ते, पाणी पुरवठा, मलनिःसारण व्यवस्था, शिक्षण, वैदयकीय रुग्णालये, सार्वजनिक स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन, नदी स्वच्छता, परिवहन सेवा, उद्याने, क्रिडांगणे, महिलांसाठी सुविधा, मागासवर्गीय तसेच दिव्यांग कल्याण, पर्यावरण व गोदावरी संवर्धन इ. बाबींचा विचार करण्यात आलेला आहे.

## ❖ सार्वजनिक आरोग्य विभाग :

| | |
|---|---|
| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. 26.29 कोटी |
| सन २३-24 सूधारीत | रु. 25.97 कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु. 44.33 कोटी |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना खर्च वगळुन) | |

- नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात 4 रूग्णालये व 30 शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहेत. सार्वजनिक रूग्णालयांमध्ये आरोग्य सेवा, शस्त्रक्रिया, गर्भवती माता व नवजात शिशुकेअर सेवा पूरविल्या जातात. तसेच आवश्यक उपचार व प्रतिबंधात्मक सुविधा देण्यात येतात. शहर प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत बाहय रूग्ण तपासणी व उपचार तसेच कूटूंब कल्याण, लसीकरण, किटकजन्य आजार, क्षयरोग, कुष्ठरोग, माता व बालसंगोपन कार्यक्रम इ.राष्ट्रीय कार्यक्रम राबविले जातात.
- सन 2023-24 मध्ये स्व.बाळासाहेब ठाकरे रुग्णालय येथे नागरीकांसाठी सवलतीच्या दरात CT MRI चाचणी सुरु करण्यात आलेल्या आहे.
- सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 106 Health & Wellness सेंटर सुरु करण्यात येणार आहे.
- सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत स्व.बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना एकुण 25 आरोग्य केंद्र सुरु करण्याचे लक्ष्य असुन सन 2024-25 मध्ये 12 आरोग्य केंद्र सुरु करण्यात येणार आहे.
- नाशिक मनपा हद्दीतील कुष्ठपिडीतांना विभागार्माफत दर माहे र.रु.1500/- इतके अनुदान उदारनिर्वाह करीता देण्यात येत आहे.

## ❖ झोपडपट्टी सुधारणा विभाग:

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात झोपडपट्ट्यांची वाढती संख्या लक्षात घेता नाशिक महानगरपालिकेमार्फत झोपडपट्टी वासीयांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे हेतुने खालील प्रमाणे योजना राबविण्यात येत आहे.

- **रमाई आवास योजना (अनुसुचित जाती व नवबौध्द घरकांसाठी घरकुल योजना) -**
  आजपावेतो एकूण 138 लाभार्थी यांना एकूण र.रू. 189.45 लक्ष इतके अनुदान वाटप करण्यात आले आहे.
- **जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूथ्थान अभियांनांतर्गत शहरी गरीबांकरीता मुलभूत सुविधा पुरविणे (बी एस यु पी) योजना -**
  उपरोक्त योजनेव्दारे बांधण्यात येणाऱ्या इमारतीत 269 स्क्वेअर फुटाची सदनिका दिली जाती. आजपावेतो नाशिक मनपा क्षेत्रात एकूण् ७४६० इतक्या सदनिका बांधण्यात आलेल्या आहेत, त्यापैकी 7252 सदनिका वाटप करण्यात आले असून उर्वरित २०८ सदनिकांसाठी लाभार्थी निश्चित झाल्यानंतर सदनिकांची सोडत प्रक्रिया करण्यात येईल.
- **प्रधानमंत्री आवास योजना -**
  केंद्र शासनाने जाहिर केलेल्या “सर्वांसाठी घरे” या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी मनपा क्षेत्रात करण्यात येत असून घटक क्र. 04 आर्थिक दृष्टया दुर्बल (EWS) घटकातील लाभार्थ्याद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यास अनुदान अंतर्गत एकूण ९१ लाभार्थी मंजुर करण्यात आले असून ५० लाभार्थ्यांचे घरकुलाचे बांधकाम पुर्ण झाले आहे, तर उर्वरीत घरकुलाचे बांधकाम प्रगती पथावर आहे. आज पावेतो एकूण र.१६४.४० लक्ष इतके अनुदान वाटप करण्यात आले आहे.

## ❖ राष्ट्रीय फेरीवाला धोरण

- ✓ नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील दिनांक ०१/०१/२०२४ चे स्थितीस अनुसरुन ८५९६ फेरीवालांची बायोमेट्रिक पध्दतीने नोंदणी करणेत आलेली आहे.
- ✓ या नोंदणीकृत फेरीवालांना विक्री प्रमाणपत्र व ओळखपत्र देणेची कार्यवाही सुरु आहे. फेरीवालांकडुन दैनंदिन जागा लायसन्स फी वसुलीसाठी ऑनलाईन पध्दती अवलंबविण्यास येणार आहे. त्यामुळे मनपाच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.

❖ **सार्वजनिक बांधकाम विभाग :**

| | |
|---|---|
| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. 372.22 कोटी |
| सन २३-24 सूधारीत | रु. ४६३.९1 कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु. ३४६.५७ कोटी |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना खर्च वगळुन) | |

- नाशिक महानगरपालिका हद्दीतील गुजरात राज्यास जोडणाऱ्या महत्वाचा पेठ रोडच्या कॉक्रीटीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे.
- नाशिक पश्चिम विभागातील मनपा मुख्यालय समोरील जुना सी.बी.एस. ते कॅनडा कॉर्नर पावेतो रस्ता विकसित करणेचे काम हाती घेणेत आले आहे.
- नाशिक मनपा हद्दीत दिव्यांगाकरीता शिक्षण, प्रशिक्षण व सेवा सुविधा केंद्र (ETC Center) चे काम पुर्ण झाले असून दिव्यांगाकरीता खुले करणेत आले आहे.
- अपघात नियंत्रणाच्या दृष्टीने नाशिक शहरातील विविध ब्लॅक स्पॉट, हॅाट स्पॅाट येथे विविध उपाययोजना तातडीने करणेच्या दृष्टीने तरतूद करण्यात आली आहे.
- नाशिक शहरातील पंचवटी येथील नाट्यगृह लवकारात लवकर नागरिकांच्या सेवेत यावे व उर्वरीत कामे तातडीने पुर्ण करता यावे यासाठी तरतूद करण्यात आली आहे.
- नाशिक शहरातील रस्ते परिपुर्ण आर्थिक तरतूद उपलब्ध होईपावेतो सुस्थितीत राहावेत यासाठी रस्ते दुरुस्तीसाठी तरतूद करण्यात आली आहे.
- राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत नाशिक मनपा हद्दिवरील आडगांव ट्रक टर्मिनस येथे इलेक्ट्रीक बस डेपो उभारणे याकरीता १५ व्या वित्त आयोग निधीतून तरतूद करण्यात आली आहे.
- नाशिक शहरातील विविध ठिकाणी असलेले बेघर यांचेसाठी निवारा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासन योजनेच्या माध्यमातून बेघर निवारा केंद्र शासन अनुदान NULMच्या निधीतून बांधण्यात येणार आहेत.
- नाशिक शहरासाठी सार्वजनिक वाहतुकीसाठी निओमेट्रो प्रकल्प लवकरात लवकर सुरु होणेच्या दृष्टीने शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे.
- नाशिक शहरातील विविध नदी- नाले यांवर बांधलेले पुल, स्वांतत्र्यवीर सावरकर उड्डाणपुल याचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन त्यांना सुस्थितीत ठेवणेयासाठी सुचविलेल्या उपाययोजना यासाठी शासनस्तरावरुन निधी उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.
- नाशिक शहरातील विविध रस्त्यांचे रोड सेफ्टी ऑडीट एन.जी.ओ च्या माध्यमातून करण्यात येणार असून त्यावर समितीने सुचविलेल्या तातडीच्या उपाययोजनांची सुरुवात करुन कायमस्वरुपी उपाययोजनांसाठी शासन स्तरावरुन निधी उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.
- फाळके स्मारकच्या जागेत रामोजी फिल्म सिटीच्या धर्तीवर विविध सुविधा पुरविणे, थिम पार्क, वॉटर पार्क मधील नवीन उपकरणे बसविणे, अँम्युझमेंट पार्क, ॲडव्हेंचर पार्क, फिल्म सिटी तयार करणेत येणार आहे, त्याचे विकसनासाठी

शासनाच्या पर्यटन विभागाकडून निधी उपलब्धततेसाठी प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच फाळके स्मारक नियोजन व विकसन करणेच्या दृष्टीने नामांकीत व अनुभवी सल्लागार यांच्याकडून ऑफर मागविण्यात येणार आहे.

- नाशिक शहरातील वायु प्रदुषण कमी करण्यासाठी व नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन होणेच्या दृष्टीने उपाययोजनेचा भाग म्हणून केंद्र सरकारच्या क्लीन एअर प्रोग्राम अंतर्गत नविन नाशिक, नाशिकरोड व पंचवटी येथे विद्युत दाहिनी बांधण्यात येत आहेत.
- सायन्स सेंटर हे टिकरींग लॅब माध्यमातून उभारणेत येणार असून शाळा कॉलेजांसाठी कॉमन फॅसिलिटी सेंटर उभारणेत येणारे आहे. शासनाच्या सन २०२० नवीन शिक्षण धोरणानुसार सदर सायन्स सेंटर उपयोगी पडणार असून शाळा, कॉलजांना संशोधन करणे कामी उपयोग होणार आहे. सदर ठिकाणी वर्षातून कमीत कमी १०० कार्यक्रमांचे आयोजन करणेत येणार आहे.
- नाशिक महानगरपालिका हद्दीवर पेठरोडवर सुरु असलेले आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियमच्या दुसऱ्या टप्प्याच्या विकसनासाठी तरतूद करण्यात आली आहे.
- आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नियोजन आणि आवश्यक विकास कामे यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करणे, शासनाकडे निधीसाठी प्रकल्प अहवाल सादर करणे यासाठी नियोजनास सुरुवात करण्यात आली आहे.

### ❖ पाणी पुरवठा व्यवस्थापन व यांत्रीकी विभाग :

| | |
|---|---|
| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. 91.09 कोटी |
| सन २३-24 सुधारीत | रु. 82.16 कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु. 104.97 कोटी |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना खर्च वगळुन) | |

नाशिक शहरासाठी दररोज पाणी पुरवठा करिता सुमारे ७५% पाणी गंगापूर धरणातून व २५% पाणी मुकणे धरणातून पाणी उचलण्यात येते.

- सद्य:स्थितीत दररोज सरासरी सुमारे ५५५ दशलक्ष लिटर्स पाणी धरणातून उचलण्यात येते. सदर पाणी शहरातील विविध ७ जलशुध्दीकरण केंद्रात शुध्दीकरण करुन ११९ जलकुंभ व सुमारे २४१० कि.मी.लांबीच्या जलवाहिन्यांद्वारे शहरात वितरित करण्यात येते.
- सद्य:स्थितीत असलेली पाणी गळती व हिशोब बाहय पाणी (NRW) कमी करणेसाठी जलशुध्दीकरण केंद्राची सुधारणा व वितरण व्यवस्थेतील सुधारणा याकरीता र.रु ३५० कोटी रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) राज्य शासनास अमृत २.० योजने अंतर्गत सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पाचे काम सन २०२३-२४ ते सन २०२५-२६ या वर्षात करण्याचे नियोजन आहे.

- **15** व्या केंद्रीय वित्त आयोगाचे अनुदानातून गंगापूर धरण ते बारा बंगला जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत १८०० मीमी व्यासाची लोखंडी मुख्य गुरुत्ववाहिनी टाकणेचा र.रु.२१० कोटीचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली असून निविदा प्रसिध्द करणेत आली आहे. सदर योजनेचे काम सन २०24 - 25 ते सन २०२५ - २६ या वर्षांत करण्याचे नियोजन आहे.

❖ **मलनि:स्सारण व यांत्रीकी विभाग :**

| | |
|---|---|
| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. 68.42 कोटी |
| सन २३-24 सूधारीत | रु. 45.57 कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु. 107.40 कोटी |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना खर्च वगळुन) | |

- नाशिक महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये एकुण १८ पंपींग स्टेशनद्वारे व ६ मलजल प्रक्रिया केंद्रावर (STP) प्रतिदिन ३९२.५० एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रीया करण्याची क्षमता उपलब्ध आहे.
- गोदावरी नदीचे प्रदुषण कमी करण्यासाठी विविध शासकिय योजनांद्वारे प्रकल्प राबविण्याचे नियोजन केले आहे.

i. नाशिक मनपाच्या चार जुन्या मलशुध्दीकरण केंद्रांची सुधारणा करणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नदी संवर्धन संचलनालय (NRCD) नवि दिल्ली येथे सादर करण्यात आले आहे.

ii. अमृत २.० योजनेअंतर्गत तपोवन व आगरटाकळी या मलशुध्दीकरण केंद्रांची सुधारणा करण्याच्या कामांचा समावेश केला असुन सदर कामांना प्रशासकिय मान्यता मिळालेली आहे.

iii. केंद्रशासन पुरस्कृत १५ वा वित्त आयोग निधीतून गंगापुर मलनि:स्सारण केंद्राची क्षमता वाढविणे व प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुर्नवापर करण्यासाठीची यंत्रणा उभारणेचे काम हाती घेण्यात आले आहे.

iv. आगामी सिंहस्थ कुंभमेळा व गोदावरी नदी संवर्धनासाठी केंद्रशासन पुरस्कृत नमामी गंगेच्या धर्तीवर गोदावरी नदीसाठी “नमामी गोदा” प्रकल्प प्रस्तावित केला आहे. त्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी सल्लागाराची नेमणुक करण्यात आलेली आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर अहवाल तयार करुन राज्य शासनामार्फत केंद्र शासनास निधीसाठी सादर करण्यात येणार आहे.

### ❖ विद्युत व्यवस्था विभाग :

| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. 64.78 कोटी |
|---|---|
| सन २३-24 सूधारीत | रु. ७५.४१ कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु. ९७.०६ कोटी |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून) | |

मनपा स्मार्ट लाईटींग प्रकल्पाचे १००% काम यशस्वीपणे पुर्ण करण्यात आल्यामुळे मनपाची पथदिवे दुरुस्ती साहीत्य खरेदी पोटी होणारे वार्षिक खर्च र.रु. 4 कोटींची बचत होत आहे, तसेच वाढलेल्या पथदिप संख्येमुळे त्यांच्या दुरुस्तीकामी लागणाऱ्या अतिरिक्त मनुष्यबळ खर्चात वार्षिक ३.०० कोटीची बचत होत आहे. या व्यतिरिक्त वीज बचतीच्या रक्कमेमधुन ५% आर्थिक हिस्सा मनपास मिळत आहे.

- ➢ नाशिक मनपा मार्फत शहरात विविध चौकांमध्ये ३३ ठिकाणी स्वयंचलीत यंत्रणा (ट्रॅफीक सिग्नल) कार्यान्वित आहेत.
- ➢ मनपा मुख्यालय, विभागीय कार्यालये व फायर स्टेशन या इमारतींवर वर सोलर पॅनल बसविल्यामुळे मनपाची विजबिलात वार्षिक अंदाजे र.रु. १.०० कोटींची बचत होत आहे.
- ➢ नाशिक शहरात NCAP अंतर्गत विविध ठिकाणी इलेक्ट्रिकल व्हेइकल चार्जिंग स्टेशन उभारणे तसेच सार्वजनिक शौचालय व स्वा. वीर सावरकर जलतरण तलाव, नाशिक पश्चिम व राजमाता जिजाऊ आंतरराष्ट्रीय तरण तलाव नाशिक रोड येथे सोलार रूफ टॉप बसविणे ही कामे प्रस्तावित आहेत.

### ❖ कार्यशाळा व्यवस्थापन विभाग

| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. 6.41 कोटी |
|---|---|
| सन २३-24 सूधारीत | रु. 10.33 कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु.12.35 कोटी |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून) | |

15 व्या वित्त आयोगा अंतर्गत Million Plus Cities गटातील ULBs साठी Air Quality या घटकासाठी मिळालेल्या अनुदानातून नाशिक शहरातील सार्वजनीक ठिकाणचे मोठे रस्ते, बाहय व अंतर्गत वळण रस्ते इत्यादी साफसफाई व स्वच्छता करणेकामी व त्यायोगे शहरातील हवा प्रदुषण कमी करणेसाठी C.N.G चालणारे सेल्फ प्रोपेल्ड मॅकेनिकल रोड स्विपर मशिन खरेदी करुन कार्यान्वीत करणेत आलेले आहे.

### ❖ परिवहन सेवा

| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. 84.73 कोटी |
|---|---|
| सन २३-24 सूधारीत | रु. 92.80 कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु. 80.75 कोटी |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून) | |

- ➢ CITILINC तर्फे २०० CNG व ५० Diesel बसेस GCC तत्वावर चालवण्यात येत आहेत. दररोज सरासरी 83 हजार अधिक प्रवाशी हे CITILINC च्या बसने प्रवास करतात.
- ➢ नाशिक सिटी बस या नावाने मोबाइल अँप बनवले आहे. याद्वारे प्रवाशांना बसचे स्थान, मार्गाची माहिती,

ऑनलाईन तिकीट बुक करण्याची सुविधा तसेच जवळचे बस थांबे यांची माहिती मिळते.

- प्रवाश्यांच्या सोयीसाठी शहरात विविध ठिकाणी बस थांबे BOT तत्वावर उभारण्यात येत आहेत.
- पीएम ई-बससेवा अंतर्गत मनपाच्या शहर बससेवेसाठी सन २०२४-२५ मध्ये ५० इलेक्ट्रीक बसेस जी.सी.सी. तत्वावर घेण्याचे प्रस्तावीत आहे. तसेच इलेक्ट्रीक बसेससाठी आडगांव ट्रक टर्मिनल येथे स्वतंत्र बसडेपो प्रस्तावित आहे.

## ❖ माहिती व तंत्रज्ञान विभाग :

### ➢ ई-गव्हर्नन्स E- Governance

| | |
|---|---|
| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. 3.07 कोटी |
| सन २३-24 सुधारीत | रु. 4.45 कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु. 6.20 कोटी |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून) | |

मा.महाराष्ट्र शासनाचे ई- प्रशासन धोरण अन्वये नाशिक महानगरपालिकेच्या संगणकीकरण कामकाजात माहिती व तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करुन दैनंदिन कामकाजात सुसूत्रता, गतीमानता पारदर्शकता प्रस्थापित करण्याचा नाशिक महानगरपालिका प्रशासनाचा मानस आहे.

- नाशिक महानगरपालिका जाहिरात व परवाने विभागामार्फत कर संकलन व व्यवस्थापनाकरीता ऑनलाईन संगणकीय कार्यप्रणाली व मोबाईल अँप विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. कर संकलन जलदगतीने व पारदर्शक पध्दतीने करण्यात येवून सदरचे कर संकलनाच्या कामकाजास गतीमानता देता येईल याकामी कार्यप्रणाली विकसीत करण्यात आली असुन सदर कार्यप्रणालीची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

- ✓ मा.शासनाच्या ई-प्रशासन धोरणांतर्गत पेपरलेस संकल्पनेची अंमलबजावणी करणेकामी नाशिक महानगरपालिका प्रशासन नेहमीच प्रयत्नशील असते, तरी त्याकरीता विविध विभागाचे संगणकीकरण करणे, ई- ऑफिस प्रणालीचा प्रभावी व काटेकोर वापर करणे, कार्यालर्यामध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा पर्याप्त वापर करणे, त्याचबरोबरच अस्तित्वातील ई.आर.पी. कार्यप्रणालीचे रिप्लॅटफॉर्मेशन व अपग्रेडेशन करण्याचे प्रस्तावित असुन ई.आर.पी GAP Analysis करुन कार्यप्रणालीचे सुलभीकरण करण्यात येवून कार्यप्रणाली हया कार्यक्षम करण्याचे प्रस्तावित आहे.
- ✓ Facebook Page, Twitter Handle, Youtube, Linkedin, NMC Insatgram असे विविध Social Media platforms माध्यमातुन कार्यक्षेत्रात विविध उपक्रम, हेल्पलाईन, शासन निर्देशनाचे व विविध माहितीचे प्रसारण करणे, मनपा निवडणुकीचे इ.बाबतची माहिती प्रभावीपणे व जलदगतीने नागरिकांपर्यत पोहोचविण्याचा येते.

## ❖ घनकचरा व्यवस्थापन विभाग

✓ **साफसफाई व स्वच्छता**

| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. 81.69 कोटी |
|---|---|
| सन २३-24 सूधारीत | रु. 114.56 कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु. 111.92 कोटी |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून) | |

शहरातील सार्वजनिक रस्त्यांची, मोकळी मैदाने, सार्वजनिक ठिकाणे, भाजी मार्केटस इ.ची दररोज 1780 सफाई कर्मचा-यांमार्फत स्वच्छता करणेत येते. नाशिक पुर्व, ना.पश्चिम व गोदाघाट परिसर येथील सार्वजनिक ठिकाणांची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता हि बाहययंत्रणेद्वारा ठेकेदाराने त्याच्या आस्थापनेवर नियुक्ती केलेल्या ७०० कंत्राटी मनुष्यबळाद्वारे करण्यात येते.

✓ **घनकचरा व्यवस्थापन**

महानगरपालिका क्षेत्रात घंटागाडी प्रकल्प राबविण्यात येऊन केरकचरा दररोज ठेकेदाराव्दारे अंदाजे 400 घंटागाडी वाहनांद्वारे संकलित करून खत प्रकल्पावर रवाना करणेत येतो. दैनंदिन सरासरी ७५० ते ७८० मे.टन कचरा संकलन करण्यात येतो.

✓ **मोफत अंत्यसंस्कार योजना**

महानगरपालिकेचे प्राधिकृत अमरधाम येथे मोफत अंत्यसंस्कार योजने अंतर्गत सर्व धर्मिय मृतदेहांचे दहन, दफनविधी इ. अंत्यसंस्कारासाठी साहित्य व सेवा मोफत पुरविणेत येते. त्याचप्रमाणे, सद्यस्थितीत डिझेल शवदाहिनीचा वापर मृतदेहांचे अंत्यसंस्कारासाठी सुरू आहे.

➢ **नाशिक महानगरपालिकेमार्फत स्वच्छते बाबत उपाय योजना -**

- ✓ हागणदारीमुक्त शहर
- ✓ कचरामुक्त शहर
- ✓ शौचालय स्वच्छता व व्यवस्थापन
- ✓ प्रतिबंधीत प्लास्टीक वापरा संदर्भातील कार्यवाही
- ✓ नदीपात्रांचे जलप्रदुषण होऊ नये याबाबत उपाय योजना व उपक्रम
- ✓ श्रीगणेशोत्सव पर्यावरणपुरक घरगुती आरास करणे, कृत्रिम विर्सजन तलाव, श्रीविसर्जन करीता अमोनियम बायकार्बोनेट पावडर पुरविणे इ.

❖ **पर्यावरण व गोदावरी संवर्धन विभाग**

- ✓ पर्यावरण संवर्धनासाठी वायु प्रदूषण, जल प्रदूषण, मृदा प्रदूषण कमी करणे, तसेच पर्यावरणातील नैसर्गिक साखळी सदृढ ठेवणे आवश्यक आहे. शहरातील वायु प्रदूषण व नद्यांचे प्रदूषण टाळण्यासाठी पर्यावरण विभागामार्फत राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत प्राप्त रकमेतून ५०% कामे व इतर विविध स्त्रोतातून 80% कामे करण्याचे उद्दिष्ट असून सदर उद्दिष्ट गाठण्यासाठी रस्त्याच्या कडेच्या हरितपट्ट्यांचा विकास, हरित भिंती, दुभाजक व वाहतूक बेट हरितीकरण, विद्युत शवदाहिनी, स्विपींग मशीन, सी & डी प्लांट, इ व्ही चार्जिंग स्टेशन, इ. करून शहरातील वायू प्रदूषण कमी करणे व जास्तीत जास्त सौर ऊर्जेस चालना देऊन शास्वत ऊर्जा विकास निर्माण करण्यासाठी पर्यावरण विभाग कार्य करीत आहे.
- ✓ जल प्रदूषण प्रामुख्याने मलजल, औद्योगिक जल यामुळे होते, ते थांबवण्यासाठी “नमामि गोदा” या कार्यक्रमांतर्गत शहरातील गोदावरी नदी, तिच्या उपनद्या व ओढे स्वच्छ राहण्यासाठी शहरातील सांडपाण्याचा स्वतंत्र वाहिन्या निर्माण करणे, अस्तित्वातील मलशुध्दीकरण केंद्राचे नुतनिकरण (Up-gradation) करणे व नदयांमध्ये कचरा निर्माल्य व इतर प्रदूषणकारी घटक टाकणे परावत्त करण्यासाठी जनजागृती निर्माण करणे हा प्रमुख उद्देश आहे.
- ✓ आगामी सिंहस्थ कुंभ मेळा विचारात घेऊन गोदावरी नदीचे प्रदूषण रोखणे, पाणी शुद्ध ठेवणे तसेच विविध सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने तज्ञ सल्लागाराची नेमणूक करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम **“नमामी गोदा”** प्रकल्प अंतर्गत हाती घेण्यात आले आहे. प्रकल्प अहवाल तयार करून केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी व निधी मिळण्यासाठी सादर करण्यात येणार आहे.

❖ **समाजकल्याण विभाग :**

**नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध दुर्बल घटकांना उचित सेवा- सुविधा प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने,**

- ✓ **5% <u>मागासवर्गीय कल्याणकारी योजना</u> -** अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती/ विमुक्त जाती व भटक्या जमाती या दुर्बल घटकांकरीता विविध कल्याणकारी योजना अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मागासवर्गीय युवक व युवतींना उच्च शिक्षणासाठी जसे वैद्यकीय व

अभियांत्रिकी इत्यादी शिक्षणाकरीता शिष्यवृती योजना सुरु करणे व कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

- ✓ **5%** **<u>महिला/बाल कल्याण कल्याणासाठी</u> -** महिला व बालकल्याणासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या ५ % निधीतुन घटस्फोटीत /विधवा / परित्यक्त्या महिला तसेच त्यांचे मुलांकरीता विविध चार कल्याणकारी योजना राबविल्या असून चालु अर्थिक वर्षात २९५ महिला लाभार्थ्यांना लाभ मंजुर करुन अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे शहरातील महिलांना त्यांचे स्वयंरोजगार सुरु करणे करीता अर्थसहाय्य योजना ही नविन योजना प्रस्तावित करण्यात येत आहे.

- ✓ **५% दिव्यांग कल्याणासाठी -** महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांगांना विविध प्रकारचे अर्थसहाय्य देणेकरीता महानगरपालिकेतर्फे एकुण १२ कल्याणकारी योजना सुरु करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये चालु वर्षात UPSC/MPSC च्या परीक्षांमध्ये उर्तीण होणाऱ्या दिव्यांगांना प्रोत्साहन पर शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली असून आज पावेजो २५६० लाभार्थ्यांना विविध योजने अंतर्गत लाभ देण्यात आलेला आहे.
    - बेरोजगार दिव्यांग अर्थसहाय्य योजना व मतीमंद / बहुविकलांग दिव्यांग अर्थसहाय्य योजने अंतर्गत दर महा अर्थसहाय्य लाभार्थ्याचे बँक खात्यावर जमा केले जात आहे.
    - दिव्यांगांसाठी स्वतंत्र विशेष उद्यान (Sensory Garden) उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.
    - दिव्यांगासाठी दिव्यांग भवन कार्यान्वित करण्यात आले आहे.

- ✓ **5% क्रिडा धोरण -** राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रथम ,व्दितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडुंना क्रिडा शिष्यवृत्ती देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे.

- ✓ **ज्येष्ठ नागरीक धोरण -** मा.शासनाचे ज्येष्ठ नागरीक धोरणाची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने नविन वर्षात ज्येष्ठ नागरीकांकरीता विरंगुळा केंद्र/ उद्यान/दवाखाना या सारख्या ठिकाणी सुविधा देण्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात येत आहे.

- ✓ **युवा धोरण -** या अंतर्गत शहरातील युवकांकरीता किमान कौशल्य विकास कार्यक्रम तसेच इतर युवकांचे सबलीकरणासाठी इतर योजना राबविण्यात येणार आहे.

## ❖ शिक्षण विभाग

| | |
|---|---|
| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. 7.39 कोटी |
| सन २३-24 सूधारीत | रु. 7.51 कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु. 12.38 कोटी |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळुन) | |

महानगरपालिकेच्या शाळांना भौतिक पायाभूत सुविधा म्हणजेच वर्ग खाल्या, पिण्याच्या पाण्याची सोय, विद्युत सुविधा, मुलामुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महापालिकेवर आहे. सद्यास्थितीत मनपाच्या मराठी माध्यमाच्या प्राथमिक 73, हिंदी माध्यमाच्या -04, उर्दू माध्यमाच्या -11 अशा एकूण 88 प्राथमिक शाळा तसेच मराठी माध्यमिक विद्यालय -10, उर्दू माध्यमिक-2 असे एकूण 12 विद्यालये आहेत. प्राथमिक व माध्यमिक मध्ये 15102- मुले व 15360 मुली शिक्षण घेत आहेत. प्राथमिक व माध्यमिक असे एकूण 30462 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

### ✓ स्मार्ट स्कूल प्रकल्प

- मनपाच्या एकूण 82 शाळांमध्ये 656 स्मार्ट क्लासरुम , 69 संगणक कक्ष, 656 वर्गामध्ये 75 इंची इंटरअॅक्टीव फ्लॅट पॅनल, डिजिटल अभ्यासक्रम, इंटरनेट लॅन कनेक्टिव्हिटी, ग्रीन बोर्ड, सॉप्ट पिन बोर्ड, विदयार्थी ब्रेच , शिक्षक खुर्चा व टेबल, एलईडी टयुबलाईट, पंखे बसविण्यात आले आहेत.
- मुख्याध्यापक कक्ष एकूण 82 अद्यावत करणेत आले आहेत.
- 82 शाळांमध्ये शालेय स्तरावर क्लाउड आधारित शाळा प्रशासन सॉप्टवेअर, 200 एमबीपीएस किमान गतीसह ब्रॉडबँड इंटरनेट कनेक्टिव्हिटी इ. यंत्रणाची व्यवस्थाही करणेत आलेली आहे.
- <u>सी.एस.आर. फंडातून केलेली कामे-</u> डिमार्ट यांचेमार्फत- 9 प्राथमिक शाळांमध्ये 5 संगणक कक्ष, त्यामध्ये 105 संगणक व 9 संगणक शिक्षक, फर्निचर, इंटरनेट, बालापेटींग देण्यांत आलेली आहे. तसेच 5 वाचन खोल्या, त्यामध्ये मुलांना आवड असलेली 2000 वाचन पुस्तके, माहिती व आवड निर्माण करणेसाठी 8 पुस्तके पुरविणेत आली आहे. लॅब्ररी व फर्निचर बनविणेत आलेले आहे. बालारंगकाम करणेत आलेले आहे.
- <u>सक्सेस ग्लोबल फांऊडेशन मार्फत केलेली कामे-</u> 10 प्राथमिक शाळा व 2 माध्यमिक शाळा यामध्ये मियावॉकी वन प्रकल्पच्या अंतर्गत 2900 झाडे लावणेत आली आहे. लागवड केलेल्या प्रत्येक झाडासाठी ठिंबक सिंचन व्यवस्थाही करणेत आलेली आहे.
- शालेय कामकाज डिजीटल स्वरुपात करणेत आलेले आहे इ.शैक्षणिक सुविधा देऊन मनपाच्या 82 शाळा स्मार्ट करणेत आलेल्या आहेत.

## ❖ घनकचरा व्यवस्थापन (प्रक्रिया) यांत्रिकी विभाग

- ✓ नाशिक महापालिकेच्या हद्दीतील संपूर्ण शहरातून घनकचरा दैनंदीन घंटागाडी द्वारे मनपा घनकचरा व्यवस्थापन विभाग (प्रक्रिया) पाथर्डी शिवार येथे आणण्यात येतो त्यापैकी ओल्या कचऱ्यावर कल्चर, सॅनिट्रेट फवारुन त्याची दुर्गंधी कमी करुन त्या घनकचऱ्यावर 30 दिवस प्रक्रिया करुन त्यापासून कंपोस्ट खत तयार केले जाते व सुक्या कचऱ्यापासून आर.डी.एफ. व काही प्रमाणात प्लास्टीक कचऱ्यावर प्रक्रिया करुन त्यापासून ग्रॅन्युल्स व फर्नेस ऑईल तयार करण्यात येते.
- ✓ तसेच मनपा हददीत तयार होणारे संपूर्ण घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे कामी प्रकल्पाची क्षमता वाढविण्यात आली आहे. खत तयार झाल्यानंतर अविघटनशील (इनर्ट) कचरा लँडफिलवर टाकला जातो. सन 2001 पासून सदर प्रकल्पाच्या ठिकाणी लँडफिल तयार झाल्या होत्या त्या पैकी दोन लँडफिल शास्त्रोक्त पध्दतीने रिमेडिएशन करुन उर्वरीत दोन मध्ये वाहतुक करुन टाकण्यात आले आहेत व सदर लँडफिलवर शास्त्रोक्त पध्दतीने विविध थर टाकूण कॅपींग करणेत आले आहे. प्रक्रिया झालेनंतर उरलेल्या अविघटनशील (इनर्ट) कचऱ्याची विल्हेवाट लावणे करीता नविन सॅनेटरी लँडफील तयार करणेत आली आहे.
- ✓ स्वच्छ भारत अभियांना अंतर्गत तसेच १५ व्या वित्त आयोगातून प्राप्त निधीतून नाशिक महापालिकेच्या हद्दीत तयार होणाऱ्या कन्स्ट्रक्शन ॲण्ड डिमोलेशन कच-यावर प्रक्रिया करणेसाठी १५० मे.टन प्रती दिन क्षमतेचा प्रकल्प पीपीपी तत्वावर उभारणेचे काम सुरु आहे. त्यामुळे शहरातील बांधकाम व पाडकामातून तयार होणाऱ्या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया होणार आहे.
- ✓ नाशिक मनपाचे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात नाशिक शहरातील असलेल्या वृक्षांची छाटणी केलेल्या फांदया व उद्यानांमधील पाला पाचोळा यावर प्रक्रिया करुन त्यापासुन इंधन विटा (Fuel bricks) तयार करण्यात येत आहेत.

## ❖ पशुवैद्यकीय सेवा विभाग

| | |
|---|---|
| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. 1.38 कोटी |
| सन २३-24 सूधारीत | रु. 2.83 कोटी |
| सन २४-25 प्रस्तावित | रु 5.15 कोटी |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना खर्च वगळुन) | |

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महापालिका हद्दीतील मोकाट व भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात ठेवण्याच्या दृष्टीने श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया व अँटीरेबीज लसीकरण कार्यक्रम राबविणेत येत आहे. महापालिकेच्या कत्तलखान्यात येणा-या जनावरांच्या नोंदी, कत्तल फी वसूली, करणेत येते. महानगरपालिका क्षेत्रातील मृत जनावरांची विल्हेवाट खतप्रकल्पातील इनसिनरेटर येथे करणेत येते. अनाधिकृत मांस विक्री करणा-या व्यावसायिकांवर दंड अशी कारवाई करणेत येते. मोडकळीस आलेले कत्तलखाने नव्याने तयार करणे आदी बाबीच्या कामाकरीता भांडवली तरतूद करणेत आली आहे.

## ❖ उद्यान विभाग

| | |
|---|---|
| सन २२-23 प्रत्यक्ष | रु. 16.65 कोटी |
| सन २३-24 सूधारीत | रु. 21.18 कोटी |
| सन 24-25 प्रस्तावित | रु. 33.94 कोटी |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना खर्च वगळुन) | |

- ✓ नाशिक महानगरपालिका, क्षेत्रातील मनपाच्या सहाही विभागातील विकसित व अविकसित 441 उद्याने तसेच 37 जॉगींग ट्रॅक मक्तेदार यांचे माध्यमातुन 3 वर्षे दैनंदिन देखभाल करणेची निविदा अंतिम होऊन कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.
- ✓ नाशिक मनपाच्या महसुलात वाढ होण्याचे दृष्टीने नाशिकरोड विभागातील सोमानी उद्यानात इलेक्ट्रॉनिक्स खेळणी बसविणेत आलेली आहे. तसेच पंचक येथील अमृत वन उद्यानात इलेक्ट्रॉनिक्स खेळणीसाठी जागा देण्यासाठी निविदा अंतिम मंजुरीच्या टप्यावर आहे. त्याच धर्तीवर इतरही पाच विभागातील मोठया उद्यानाचे ठिकाणी इलेक्ट्रॉनिक्स खेळणीसाठी जागा भाडे तत्वावर देणे बाबत कार्यवाही सुरु असुन याद्वारे मनपास उत्पन्न मिळुन नागरीकांना उद्यानाचे ठिकाणी अधिकअधिक सुविधा पुरविण्याचे दृष्टीने कामाचे नियोजन करणेत येत आहे.
- ✓ दिव्यांगाकरीता 5% राखीव निधीतुन उद्यान विकसित करणे, सातपुर विभागातील गंगापुर गाव येथील सं. न. 157 पै. या ठिकाणी असलेल्या जागेत दिव्यांगासाठी उद्यान विकसित करणेचे काम हाती घेण्यात आलेले असुन या आर्थिक वर्षात सदर काम पुर्ण करणेचे नियोजन करण्यात येणार आहे.
- ✓ शहरातील मोठया उद्यानाचे ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्रपणे स्वच्छतागृहाची सुविधा तसेच लहान मुलांना अत्याधुनिक खेळणीची सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी महिला व बालकल्याण 5% निधीतुन अंतर्गत या आर्थिक वर्षात निधीची तरतुद करण्यात येणार आहे.

- ✓ 15 व्या वित्त आयोगाच्या अंतर्गत नाशिक शहरातील सहाही विभागातील महत्वाच्या रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या डिव्हायडरमध्ये आकर्षक छोटया वृक्षांची लागवड करुन सुशोभिकरणाची तसेच सहाही विभागातील ओपन स्पेस, जॉगींग ट्रॅक, उद्यानाचे ठिकाणी जागा उपलब्धतेनुसार वृक्ष लागवड करणेची कामे हाती घेण्यात आली असुन सदरची कामे ही पुर्ण झाले नंतर शहरातील हवा शुध्द राहणेचे दृष्टीने मदत होऊन पर्यावरणाचा समतोल राहील.

❖ **दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान'** [DAY-NULM]

- ✓ मा.केंद्र शासन पुरस्कृत 'दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान' नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात अंमलबजावणी करणेस सुरुवात करण्यात आली आहे.
- ✓ सदर अभियानांतर्गत एकुण 1780 बचतगट स्थापित करण्यात आलेले असून सदर बचतगटांचे एकुण 75 वस्तीस्तर संघ व 2 शहरस्तरसंघ धर्मादाय आयुक्त कार्यालय अंतर्गत नोंदणीकृत करण्यात आलेले आहेत. बचत गटांतून उत्पादीत वस्तूंच्या विक्रीसाठी हक्काचा बाजार उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.
- ✓ शहरी बेघर निवारा या घटकांतर्गत शासन सर्वेक्षण नुसार आढळलेल्या एकुण 894 बेघर नागरिकांसाठी निवारे उपलब्ध करणेकामी 180 बेघर क्षमतेचे एक कायमस्वरूपी बेघर निवारा केंद्र तपोवन, पंचवटी येथे कार्यान्वित आलेले आहे व उर्वरित बेघर व्यक्तींसाठी 1049 क्षमतेचे मनपाचेमालकीचे चार जागांवरील सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) शासनास मंजुरीसाठी पाठविणेत आलेले आहे.

❖ **प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी' (PM SVANidhi)**

- ✓ नाशिक मनापा अंतर्गत 'प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी' (PM SVANidhi) ची अंमलबजावणी करणेत येत आहे. सदर योजनेंतर्गत पथविक्रेत्यांना मनपाचे शिफारस पत्र (LoR- Letter of Recommendation) देण्यात येते. सदर योजने अंतर्गत नाशिक मनपा राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. पथविक्रेत्यांना जास्तीत जास्त कर्ज वितरणात करण्यात नाशिक मनपा महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकावर आहे. नाशिक महानगरपालिकेने समृध्दी योजनेत आतापर्यंत 16493 पथविक्रेत्यांची सोशल इकोनॉमी प्रोफाईलिंग भरण्यात आली आहे. स्वनिधी से समृद्धी' योजनेंतर्गत एकूण 68213 (94%) लाभार्थ्यांना आठ योजनांचा लाभ देण्यात येऊन नाशिक महानगरपालिका राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे.

- ✓ पुढील आर्थिक वर्षामध्ये या योजनेंतर्गत 10 हजार कर्जाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना 20 हजार व 50 हजार रुपये कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच सदर लाभार्थ्यांना शासनाच्या इतर योजनांसोबत संलग्न करण्यात येईल.

❖ **अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन विभाग**

➢ **<u>आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष -</u>**

- ✓ वेगवेगळया आपत्ती उदा. पुर, भुकंप, घर पडणे, झाडे पडणे, रासायनिक दुर्घटना इ. प्रसंगी प्रथमत: प्राथमिक सहायता करणेसाठी आपत्कालीन व्यवस्थापन विभाग सुरु करण्यात आलेला आहे.
- ✓ सन 2024-25 हया वर्षात आपत्कालीन व्यवस्थापन कक्षातर्फे महापालिकेच्या प्रत्येक विभागामध्ये, प्रत्येक प्रभागामध्ये जनजागृती व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण आयोजित करुन नागरिकांना /स्वयंसेवकांना जास्तीत जास्त संख्येने प्रशिक्षीत करण्याचा मानस आहे.

➢ **<u>अग्निशमन व आणिबाणी सेवा -</u>**

- ✓ प्रत्येक विभागामध्ये एक याप्रमाणे अग्निशमन विभागाकडे सद्यस्थितीत 6 अग्निशमन केंद्रे आहे.
- ✓ अग्निशमन दलाकडे वॉटर टेंडर, फायर टेंडर, मेगा बाऊजर, फ्लड रेस्क्यु व्हॅन, हॅजमॅट व्हॅन, हैड्रोलीक प्लॅटफार्म (32 मीटर), बी.ए.सेट व्हॅन, अतिशिग्र प्रतिसाद व्हॅन (क्यु.आर.व्ही.) उपलब्ध आहेत.
- ✓ 2 डिसेंबर 2020 रोजी मा.महाराष्ट्र शासन यांनी नविन **UNIFIED DCPR** लागु केले असल्याने भविष्यात नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये 70 मिटर पेक्षा उंच इमारतींना बांधकाम परवानगी द्यावी लागणार असल्याने आगी पासुन व बचावाच्या संरक्षणासाठी विदेशी बनावटीची टर्न टेबल लॅडर / ए.एल.पी. वाहन 90 मीटर उंचीचे आग / अपघात प्रसंगी परिस्थितीवर मात करण्यासाठी खरेदी करणे गरजेचे आहे. त्यासाठी येणारा खर्च र.रु. 38,26,74,195/- आग सुरक्षा निधीतुन प्रस्तावित करण्यात येणार आहे.

❖ **कर्मचारी कल्याण विभाग**

➢ सन २०२३-२४ मध्ये मनपा अधिकारी/कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगाचा २ रा हप्ता माहे सप्टेंबर २०२३ मध्ये देण्यात आला असून, ३ रा हप्ता माहे फेब्रुवारी २०२४ मध्ये देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

- अधिकारी व कर्मचारी यांचेदरमहा वेतनातून कपात करण्यात येणाऱ्या वर्गणीतून जेवढी रक्कम जमा होते तेवढीच रक्कम मनपाचा म्हणुन कामगार कल्याण निधी मध्ये जमा केला जातो. सदर निधीतून अधिकारी / कर्मचारी यांचे करीता विविध कल्याणकारी योजन राबविण्यात येत आहे.
- अधिकारी कर्मचारी यांचे करीता व त्यांचेवर अवलंबुन असलेल्या कुटुंबातील व्यक्तींना वैद्यकीय उपचारा करीता अर्थसहाय्य, त्याचे पाल्याचे उच्च शिक्षण करीता अर्थसहाय्य, मयत कर्मचारी यांचे वारसांना अर्थसहाय्य, सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांना अर्थसहाय्य अशा योजना राबविण्यात येत आहे.

❖ **स्वेच्छा निधी व प्रभाग विकास निधी**

2%- स्वेच्छा निधी- या लेखाशिर्षामध्ये सन्माननीय सदस्यांनी सूचविलेली कामे हाती घेणेचे नियोजन करणेत येत असते. त्यासाठी महानगरपालिकेच्या स्वतःच्या उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित शिल्लकेनूसार 2% स्वेच्छा निधी राखीव ठेवणेत आलेला आहे. सन 2024-2025 करीता “स्वेच्छा निधी 2%” या लेखाशिर्षाखाली रु. १३.५९ कोटी इतकी अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रभाग विकास निधी अंतर्गत रु.42.90 कोटी तरतूद करणेत आली आहे. सदर तरतुदीतून प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील रु. 5.00 लक्ष मर्यादेतील अत्यावश्यक व स्थानिक स्वरुपाची कामे हाती घेणेत येतील. सदर कामांना प्रभाग समिती स्तरावर प्रशासकीय मान्यता देणेत येईल.

सन २०24-2025 या आर्थिक वर्षासाठी रु. 61.03 कोटी आरंभीच्या शिल्लकेसह, र.रु. 2603.49 कोटी जमेचे व रु. 2602.45 कोटी खर्चाचे मूळ अंदाजपत्रक सादर करण्यात येत आहे. तसेच सन 2024-2025 च्या मूळ अंदाजपत्रकानूसार, अखेरची शिल्लक रक्कम रु.1.04 कोटी दर्शविण्यात आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे सन 2023-2024 चे सुधारीत व सन 2024-2025 चे मूळ अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. सदर अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस विनंती आहे.

धन्यवाद... !

दिनांक. १६/०२/२०२४

(डॉ. अशोक करंजकर, भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त,
नाशिक महानगरपालिका,नाशिक

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## मा. आयुक्त, मा. स्थायी समिती व मा. महासभा यांनी संमत केलेले जमेचे अंदाज

### (सन १९९३-९४ ते २००५-२००६)

(रूपये कोटी)

| वर्ष | मा.आयुक्त | मा.स्थायी समिती | मा.महासभा |
|---|---|---|---|
| १९९३-९४ | ९०.२१ | ९२.८० | ९४.३६ |
| १९९४-९५ | १०३.४३ | ११२.१९ | ११४.३० |
| १९९५-९६ | १२६.११ | १४७.१६ | १५६.०१ |
| १९९६-९७ | १६६.४५ | १९७.१६ | २२०.५१ |
| १९९७-९८ | २००.४९ | २५७.१९ | २८९.९३ |
| १९९८-९९ | ३०३.७६ | ३६३.७६ | ४२३.५९ |
| १९९९-०० | २३८.३५ | २७८.४२ | ३४३.२६ |
| २०००-०१ | २३६.६८ | ३१५.६३ | ३१०.८८ |
| २००१-०२ | ३७५.७४ | ४३६.५८ | ४४४.५८ |
| २००२-०३ | ३८६.५७ | ५६३.०० | ५८३.०० |
| २००३-०४ | ४१०.२६ | ५६४.९८ | ५९६.९८ |
| २००४-०५ | ४१७.२१ | ४१७.२१ | ४६०.२१ |
| २००५-०६ | ४४७.३७ | ४९८.३७ | ६०७.९५ |



# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## मा. आयुक्त, मा. स्थायी समिती व मा. महासभा यांनी संमत केलेले जमेचे अंदाज

## (सन २००६-०७ ते २०२४-२५)

(रूपये कोटी)

| वर्ष | मा.आयुक्त | मा.स्थायी समिती | मा.महासभा |
|---|---|---|---|
| २००६-०७ | ४९८.४३ | ५४८.४३ | ७२०.३९ |
| २००७-०८ | ६५६.९४ | ७५१.९४ | ८७०.९४ |
| २००८-०९ | ६७७.८८ | ८५८.८६ | १०२७.८८ |
| २००९-१० | ७०७.०० | ८८२.५० | ११०२.५० |
| २०१०-११ | ७८३.६९ | ९२६.९४ | ११८२.८६ |
| २०११-१२ | १०३०.८५ | १०३०.८५ | १२४४.६४ |
| २०१२-१३ | ११७०.८५ | १८१०.८२ | २०३०.८२ |
| २०१३-१४ | १५५६.८० | २३५९.९५ | २७५५.९० |
| २०१४-१५ | १८७५.६९ | २९६५.६९ | ३०४३.६९ |
| २०१५-१६ | १४३७.६७ | १७६९.९७ | २१७९.९७ |
| २०१६-१७ | १३५७.९६ | १७३७.९६ | १७६१.५२ |
| २०१७-१८ | १४१०.०७ | १७९९.३० | २१७६.४१ |
| २०१८-१९ | १७८५.१५ | १९००.१५ | २०३३.४३ |
| २०१९-२० | १८९४.५० | १९८३.५० | २३३५.८७ |
| २०२०-२१ | २१६१.७९ | २३९०.३४ | २९४२.१८ |
| २०२१-२२ | २३६१.५६ | २७६३.८१ | २८८८.८१ |
| २०२२-२३ | २२२७.०५ | २५६७.०२ | २२२७.०५ |
| २०२३-२४ | २४७७.०७ | २४७७.०७ | २४७७.०७ |
| २०२४-२५ | २६०३.४९ | | |



# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## जमा व खर्चाचा आलेख

### (सन १९८२-८३ ते १९९६-१९९७)

(रूपये कोटी)




| वर्ष | सन ८२-८३ | सन ८३-८४ | सन ८४-८५ | सन ८५-८६ | सन ८६-८७ | सन ८७-८८ | सन ८८-८९ | सन ८९-९० | सन ९०-९१ | सन ९१-९२ | सन ९२-९३ | सन ९३-९४ | सन ९४-९५ | सन ९५-९६ | सन ९६-९७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जमा (प्रारंभिक शिलकेसह) | ११.९४ | १५.८८ | २२.४५ | २४.३४ | २६.४३ | ३६.१५ | ४६.४८ | ५०.८० | ६६.८५ | ८५.६८ | ८९.३९ | ९४.३८ | ११०.८२ | १३८.२९ | १५२.४६ |
| खर्च | १०.२२ | १२.३२ | २०.१९ | २२.०१ | २३.०५ | ३०.२१ | ३८.०९ | ३९.४६ | ५१.८४ | ७०.६४ | ७२.९३ | ७३.३६ | ९३.७८ | १२१.७९ | १४८.१८ |

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## जमा व खर्चाचा आलेख

### (सन १९९७-९८ ते २०२४-२५)

(रूपये कोटी)




| तपशील | सन ९७-९८ | सन ९८-९९ | सन ९९-०० | सन ००-०१ | सन ०१-०२ | सन ०२-०३ | सन ०३-०४ | सन ०४-०५ | सन ०५-०६ | सन ०६-०७ | सन ०७-०८ | सन ०८-०९ | सन ०९-१० | सन १०-११ | सन ११-१२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जमा (प्रारंभिक शिलकेसह) | १८२.८७ | २००.९० | २३३.५२ | २८७.६७ | ३६९.८३ | ३६८.३१ | ३४४.४९ | ३४७.१३ | ४१२.६७ | ५०७.८५ | ५८४.६४ | ६०२.७२ | ६३८.३४ | ७१५.७५ | ८३५.९६ |
| **खर्च** | १५७.३४ | १९५.२४ | २३०.३३ | २७६.७६ | ३५३.६५ | ३५९.९७ | ३३५.५६ | ३२१.८८ | ३५५.९३ | ४५६.९९ | ५४१.५५ | ५१९.६४ | ५८८.१२ | ६६५.६६ | ७८८.२९ |

| तपशील | सन १२-१३ | सन १३-१४ | सन १४-१५ | सन १५-१६ | सन १६-१७ | सन १७-१८ | सन १८-१९ | सन १९-२० | सन २०-२१ | सन २१-२२ | सन २२-२३ | सन २०२३-२४ अर्थसंकल्पीय अंदाज | सन २०२३-२४ आयुक्तांचे सुधारित अंदाज | सन २०२४-२५ मा. आयुक्तांचे अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जमा (प्रारंभिक शिलकेसह) | १००४.२० | ९१४.५७ | ९६७.०४ | ११३२.८४ | १२२५.५३ | १४४२.०५ | १६४५.९५ | २०७८.१४ | २२६५.१४ | २४२९.०१ | २३४९.१४ | २४७७.०७ | २३८०.२८ | २६०३.४९ |
| **खर्च** | ९६८.५६ | ८५९.०५ | ८९७.८५ | ९८७.६८ | १०८०.८६ | ११४३.९३ | ११६०.७४ | १३३८.२७ | १७२५.५१ | २१३४.४८ | २०५०.८१ | २४७५.८६ | २३१९.२५ | २६०२.४५ |

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## महसुली खर्च

## सन २००९-१० ते २०२४-२५

(रूपये कोटी)




| वर्ष | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ | २०१३-२०१४ | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ | २०१७-२०१८ | २०१८-२०१९ | २०१९-२०२० | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ | सन २०२३-२४ अर्थसंकल्पीय अंदाज | सन २०२३-२४ आयुक्तांचे सुधारित अंदाज | सन २०२४-२५ मा.आयुक्तांचे अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महसुली खर्च | ३०३.९५ | ४५३.९० | ४२८.२६ | ४९०.६२ | ४९६.८७ | ५५९.९३ | ५६३.८२ | ६३७.१८ | ६७१.७९ | ८००.५२ | ९०१.५३ | ८६४.६१ | ९६५.७६ | १२७०.८७ | १६८७.५५ | १५९७.५६ | १७४६.६० |
| प्रतिशत हिस्सा | ५१.६८% | ६८.१९% | ५४.३३% | ५०.६५% | ५७.४८% | ६२.३६% | ५७.०९% | ५८.९५% | ५८.७३% | ६८.९७% | ६७.३७% | ५०.११% | ४५.२५% | ६१.९७% | ६८.१६% | ६८.८८% | ६७.११% |

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## भांडवली खर्च

### (सन २००९-१० ते २०२४-२५)

(रूपये कोटी)




| वर्ष | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ | २०१३-२०१४ | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ | २०१७-२०१८ | २०१८-२०१९ | २०१९-२०२० | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ | सन २०२३-२४ अर्थसंकल्पीय अंदाज | सन २०२३-२४ आयुक्तांचे सुधारित अंदाज | सन २०२४-२५ मा.आयक्तांचे अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भांडवली खर्च | २६६.६३ | १९४.३० | ३१८.७४ | ४०७.५७ | ३१६.२४ | ३०१.४५ | ३८४.९६ | ३९८.५७ | ४३०.८४ | ३१८.५९ | ४०३.१९ | ७७७.४९ | १०८६.३३ | ६५८.१७ | ७०१.१३ | ६१६.५६ | ७४८.६९ |
| प्रतिशत हिस्सा | ४५.३४% | २९.१९% | ४०.४३% | ४२.०८% | ३६.८१% | ३३.५७% | ३८.९८% | ३६.८८% | ३७.६६% | २७.४५% | ३०.१३% | ४५.०६% | ५०.८९% | ३२.०९% | २८.३२% | २६.५८% | २८.७७% |

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## भांडवली खर्चाचा अंदाज

### (सन २०२४-२५)

| | | (रु. कोटी) | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | बांधकाम/विद्युत/उद्यान/ इतर भांडवली कामे | २९१.४८ | ३८.९४% |
| २ | नगर नियोजन | १००.०० | १३.३६% |
| ३ | शासन योजना-मनपा हिस्सा | ५१.०८ | ६.८२% |
| ४ | राखीव बाबी ("अ" व "प" भांडवली खर्च) | ९९.६० | १३.३०% |
| ५ | नगरसेवक स्वेच्छा निधी/ प्रभाग विकास निधी | ५६.४८ | ७.५४% |
| ६ | "क" भांडवली खर्च (पाणी पुरवठा/मलनि:सारण/ जलनिस्सारण) | १४६.८८ | १९.६२% |
| ७ | 'प' भांडवली खर्च | ३.१७ | ०.४२% |
| | एकूण भांडवली खर्च | ७४८.६९ | १००.००% |



# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## जमेचे अंदाज

### सन २०२४-२५

| | | (रु. कोटी) | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | वस्तू व सेवा कर (GST) /स्थानिक संस्था कर/जकात | १४७२.४७ | ५६.५६% |
| २ | मालमत्ता कर (घरपट्टी) | २४१.२५ | ९.२७% |
| ३ | नगर नियोजन | २०८.७३ | ८.०२% |
| ४ | पाणी पट्टी | ७३.२२ | २.८१% |
| ५ | मिळकत, आरोग्य, सार्वजनिक वाहतूक व अन्य विभाग इ. | २२४.६९ | ८.६३% |
| ६ | रोड डॅमेज चार्ज, ड्रेनेज/पाणी कनेक्शन फी इ. | ९९.१८ | ३.८१% |
| ७ | अनुदाने | ७.५३ | ०.२९% |
| ८ | परिवहन सेवा उत्पन्न | ० | ०.००% |
| ९ | संकिर्ण | २८.६६ | १.१०% |
| १० | अग्रीम/इतर उचल रक्कमा | १८६.७२ | ७.१७% |
| ११ | कर्ज | ०.०१ | ०.००% |
| १२ | सुरूवातीची शिल्लक | ६१.०३ | २.३४% |
| | एकूण | २६०३.४९ | १००.००% |



# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## खर्चाचे अंदाज

### सन २०२४-२५

| | | (रु. कोटी) | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम व्यवस्थापन | ३४६.५७ | १३.३२% |
| २ | सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी (पाणी पुरवठा व्यवस्थापन + मलनि:सारण व्यवस्थापन + यांत्रिकी व्यवस्थापन) | २१२.३६ | ८.१६% |
| ३ | विद्युत व यांत्रिकी व्यवस्थापन | ९७.०६ | ३.७३% |
| ४ | सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापन | ४४.३३ | १.७०% |
| ५ | घनकचरा व्यवस्थापन + घनकचरा व्यवस्थापन - यांत्रिकी + स्वच्छ भारत अभियान व्यवस्थापन | १४२.४७ | ५.४७% |
| ६ | उद्यान व्यवस्थापन | ३३.९३ | १.३०% |
| ७ | समाजकल्याण व्यवस्थापन | १६४.५१ | ६.३२% |
| ८ | शिक्षण व्यवस्थापन | १२.३७ | ०.४८% |
| ९ | सार्वजनिक वाहतूक व नियोजन + कार्यशाळा व्यवस्थापन | ९३.१० | ३.५८% |
| १० | नगर नियोजन व्यवस्थापन | १२०.०० | ४.६१% |
| ११ | मालमत्ता कर/स्थानिक संस्था कर | २.७५ | ०.११% |
| १२ | नगरसेवक स्वेच्छा निधी व प्रभाग विकास निधी | ५६.४८ | २.१७% |
| १३ | अन्य विभाग | १६७.५४ | ६.४३% |
| १४ | आस्थापना/कार्यालयीन खर्च | १००१.८३ | ३८.५०% |
| १५ | अग्रीम | १०७.१४ | ४.१२% |
| | एकूण | २६०२.४४ | १००.००% |

